# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. पंडीत एन्. शेळके
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


रासेयो/१०४६/२०१४ **अति महत्वाचे** दि. ०९/०१/२०१४

**प्रती,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**पुणे, अ.नगर, नाशिक जिल्हा**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**

**विषय :** रस्ता सुरक्षा अभियान शपथ ग्रहण कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत...
**संदर्भ :** अपोमस(वा)/(वा)/रसुअ-२०१४/मंत्री महोदय/३१२६/२०१३

**महोदय,**

महाराष्ट्र राज्यात सन २०१२ मध्ये ६६.३१६ अपघात झाले असून त्यात १३,३३३ इसम मृत्युमुखी पडले असून ४३,८४७ इसम गंभीर जखमी झालेले आहेत. तसेच अपघातात मृत्यु पावणाऱ्या व्यक्तींची आकडेवारी पाहता १५ ते २९ या वयोगटातील ३१% व ३० ते ४४ या वयोगटातील ३५% असल्याचे दिसून येते याचाच अर्थ देशातील युवावर्ग मोठ्या प्रमाणात होणारी जिवीत व मालमत्तेची हानी यांचा विचार करता रस्त्यावर होणाऱ्या अपघातांना नियंत्रणात आणणे व होणारे अपघात कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे.

युवा वर्गात रस्ता सुरक्षा विषयाच्या अनुषंगाने जास्तीत जास्त जागृती होणे आवश्यक आहे. हे लक्षात घेवून महामार्ग पोलीसांनी सन २०११ पासून महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा जनजागृतीचे काम हाती घेतले आहे, त्यामध्ये महामार्ग पोलीसांतर्फे युवा मेळावे आयोजित करुन मोठ्या प्रमाणात युवा वर्गामध्ये जनजागृती करण्यात आलेली आहे. माध्यमिक, महाविद्यालयीन स्तरावर रस्ता सुरक्षेविषयी विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत.

आजचा विद्यार्थी हा उद्याचा चालक असल्याने त्यांच्यात जागृती झाल्यास भविष्यात अपघातांना आळा बसेल असेच अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या उत्पादनक्षम वयोगटातील व्यक्तीच्या संख्येत घट होईल. रस्ता सुरक्षा अभियान २०१४ अंतर्गत राज्यातील सर्व कॉलेजचे प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांकडून **दि. ११/०१/२०१४ रोजी स. ११.०० वा.** रस्ता सुरक्षेकरीता वाहतूक नियमांचे स्वतः पालन करणार तसेच इतरांना पालन करणेबाबत आवाहन करणार म्हणून शपथ घ्यावयाची आहे. रस्ता सुरक्षे विषयी घ्यावयाच्या शपथेचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे.

सदर शपथ ग्रहणाचा कार्यक्रम झाल्यानंतर सर्व प्राचार्यांनी कॉलेजचे नाव, पत्ता व किती विद्यार्थ्यांनी शपथ घेतली याबाबतचा अहवाल विद्यापीठाला व शिक्षण विभागास पाठवायचा आहे. विद्यापीठाने व शिक्षण विभागाने सदरची माहिती एकत्रित करुन त्याचा एकत्रीत अहवाल तात्काळ महामार्ग पोलीसांच्या व रासेयो कार्यालयाच्या खालील इमेल आयडीवर पाठवायचा आहे.

याबाबत काही शंका असल्यास महामार्ग पोलीसांच्या वेबसाईट वरील Post Your Feedback या ठिकाणी किंवा ई मेल आयडी nss@unipune.ac.in & highwaypolice.computerdiv@gmail.com यावर करावा, कळावे.

**सोबत – प्रतिज्ञेचा नमुना**

आपला विश्वासू
9/1/2014
**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

Pc2/Tin Job/Daily Lette244

# प्रतिज्ञा

आम्ही भारताचे सुजाण नागरीक आहोत. गेल्या वर्षी आम्ही रस्ते अपघातात आमचे १३,३३३ देशबांधव गमावलेत तसेच २४,३२३ एवढे बांधव अपघातामुळे गंभीर झाले.

देशात घडणाऱ्या अपघातांची संख्या कमी करण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. म्हणून आज आम्ही शपथ घेतो की, रस्त्याने चालतांना अथवा वाहन चालवितांना आम्ही भविष्यात वाहतूक नियमांचे पालन करु. तसेच आमच्या मित्र-मैत्रीणी, आई-वडील तसेच इतर नातेवाईकांना त्या नियमाचे पालन करण्याचा आग्रह धरु.

१. रस्ते अपघातातील जखमींना नेहमी मदत करु.
२. दुचाकी वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करु.
३. मद्यप्राशन करुन वाहन चालवणार नाही.
४. चारचाकी वाहन चालविताना सिल्ट बेल्ट लावू.